**महाराष्ट्र शासन**
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर यांचे कार्यालय
**"वनवर्धन" इमारत, पहिला मजला, मुख्य पोस्ट ऑफीस समोर, ताराबाई पार्क, कोल्हापूर -४१६ ००३**
**कार्यालय - ०२३१/२६५३६३२** E-mail ID -ccftkolhapur@mahaoforest.gov.in / ccftkolhapur@gmail.com

---

क्रमांक - कक्ष-४-२/आस्था/वनपाल/पदोन्नती/२०२३-२४/2384 कोल्हापूर दिनांक २८/१२/२०२३

**आदेश**

**विषय :- वनपाल संवर्गातील मर्यादित विभागीय स्पर्धा परिक्षा कोट्यातील रिक्त पदे वनरक्षक संवर्गातून तात्पुरत्या स्वरुपात तदर्थ पदोन्नती देणे बाबत.**

वनरक्षकांना वनपाल पदी पदोन्नती देण्यांचे अनुषंगाने दिनांक २७/१२/२०२३ रोजी विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार निवडसुची तयार करणेत आली. त्यानुसार, पात्र ठरलेल्या खालीलप्रमाणे वनरक्षक यांना रिक्त पदांचे अधिन राहून सुधारीत वेतन मॅट्रीक्समधील **एस-९ :- २६४००-८३६००** या वेतनश्रेणीमध्ये तात्पुरत्या स्वरुपात तदर्थ पदोन्नती देण्यात येत आहे.

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडील पत्र क्र. कक्ष-१०(२)/एक/मर्या.वि.परिक्षा/प्रक्र.१३७(१७-१८)/५२६, दिनांक १६/०५/२०१९ अन्वये सन २०१५ पासून वर्ष निहाय वनपाल संवर्गातील रिक्त पदांपैकी मर्यादीत विभागीय स्पर्धा परिक्षा कोट्यातील रिक्त असलेल्या पदांमधील खुल्या प्रवर्गाची पदे ही तात्पुरत्या स्वरुपात जेष्ठतेनुसार पदोन्नतीने भरण्याची आहेत. तसेच, सदर पदोन्नती नियमित होईपर्यंत अशा पदोन्नत वनपालांना सेवा जेष्ठतेसाठी हक्क सांगता येणार नाही. सदरचे आदेश हे विविध न्यायालयीन निर्णयाचे अधिन राहून व सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब दिनांक ७/५/२०२१ अन्वये निर्गमित करणेत येत आहे.

वरील नमुद शासन निर्णय व प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडील सूचनाप्रमाणे खालील वनरक्षक यांना वनपाल पदावर तदर्थ पदोन्नतीने पदस्थापना देणेत येत आहे.

| अ. क्र. | वनरक्षकांचे संपुर्ण नांव | मुळ प्रवर्ग | निवड प्रवर्ग | कार्यरत विभाग | पदोन्नती नंतरची पदस्थापना | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | संदीपकुमार सदाशिव कुंभार | इ.मा.व. | खुला | सिंधुदुर्ग साववि | वनपाल (प्रादेशिक) कडेगांव सांगली वनविभाग | रिक्त पदावर |
| ०२ | संजय शिवाजी पोवार | अ.जा. | खुला | कोल्हापूर वनविभाग | वनपाल (वन्यजीव) आडोली वन्यजीव विभाग | रिक्त पदावर |
| ०३ | कु.कुसूम बाबासो कांबळे | अ.जा. | खुला | कोल्हापूर वनविभाग | वनपाल (प्रादेशिक) भिरवंडे सावंतवाडी वनविभाग | रिक्त पदावर |
| ०४ | संजय महादेव रणधीर | अ.जा. | खुला | चिपळूण वनविभाग | वनपाल (वन्यजीव) रासाटी वन्यजीव विभाग | रिक्त पदावर |
| ०५ | कु. रूपाली दयानंद बुचडे | अ.जा. | खुला | कोल्हापूर साववि | वनपाल (प्रादेशिक) जांभवडे सावंतवाडी वनविभाग | रिक्त पदावर |
| ०६ | कु. तेजस्विनी बळीराम कोरे (सौ.तेजस्विनी संभाजी पोवार) | अ.जा. | खुला | वन्यजीव विभाग | वनपाल (प्रादेशिक) कडेपूर सांगली वनविभाग | रिक्त पदावर |
| ०७ | संदिप पांडूरंग पवार | अ.जा. | खुला | वन्यजीव विभाग | वनपाल (वन्यजीव) मुनावळे वन्यजीव विभाग | रिक्त पदावर |
| ०८ | उस्मान शहाबुद्दीन मुल्ला | खुला | खुला | सांगली साववि | वनपाल (वन्यजीव) सिध्देश्वर वन्यजीव विभाग | रिक्त पदावर |

| अ. क्र. | वनरक्षकांचे संपुर्ण नांव | मुळ प्रवर्ग | निवड प्रवर्ग | कार्यरत विभाग | पदोन्नती नंतरची पदस्थापना | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| ०९ | नामदेव महादेव चौगुले | खुला | खुला | कोल्हापूर वनविभाग | वनपाल (प्रादेशिक) चौकुळ सावंतवाडी वनविभाग | रिक्त पदावर |
| १० | दादाराव बुधाजी बर्गे | अ.ज. | खुला | वन्यजीव विभाग | वनपाल (प्रादेशिक) इस्लामपूर सांगली वनविभाग | रिक्त पदावर |
| ११ | विक्रम बाबू निकम | खुला | खुला | सातारा वनविभाग | वनपाल (वन्यजीव) फिरतेपथक, कराड वन्यजीव विभाग | रिक्त पदावर |
| १२ | श्रीमती संजीवनी बा.नागरगोजे सौ.संजीवनी अभिजीत खाडे | भज-ड | खुला | सातारा साववि | वनपाल (सामाजिक वनीकरण) आटपाडी सांगली सामाजिक वनीकरण विभाग | रिक्त पदावर |
| १३ | सुनिल निवृत्ती शिंदे | अ.जा. | खुला | वन्यजीव विभाग | वनपाल (प्रादेशिक) सातारा सातारा वनविभाग | रिक्त पदावर |

सदरची पदोन्नती ही खालील अटी व शर्तींचे अधिन राहून तात्पुरत्या स्वरुपात देण्यात येत आहे.

१) सदर पदोन्नती ही तात्पुरत्या स्वरुपात असल्याने परिस्थितीनुसार आवश्यक वाटल्यास पदोन्नतीचे आदेश रद्द बातल करण्यात येईल किंवा आवश्यकतेनुसार कनिष्ठतम कर्मचा-यास पदावनत करण्यात येईल.

२) ज्या कर्मचा-यास सदर आदेश प्राप्त होण्यापूर्वी विभागीय चौकशी सुरु करण्यात आली असल्यास, शिक्षेच्या अमलाखाली असल्यास अथवा संबंधितास निलंबनाखाली ठेवण्यात आले असेल तर सदर पदोन्नतीचा आदेश लागू होणार नाही. याबाबत कार्यालय प्रमुखाने खातरजमा करावी.

३) पदोन्नत वनपाल यांना सदर आदेश प्राप्त झालेचे दिनांकापासून ७ दिवसाचे आत पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू न झाल्यास संबंधितास पदोन्तीची आवश्यकता नाही, असे गृहित धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

४) शासन निर्णयाप्रमाणे मत्ता व दायित्व विवरणपत्र दिल्याची खात्री करूनच पदोन्नतीचे पदावर रुजू होणेसाठी कार्यमुक्त करणेचे आहे.

५) मागासवर्गीय कर्मचा-यांच्या बाबतीत जातीच्या दाव्यासंबंधी भविष्यात वाद निर्माण झाल्यास संबंधीत कर्मचारी जबाबदार राहील व चौकशीत जर का संबंधीत कर्मचा-याचा जातीचा दावा खोटा असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधिताविरूध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येवून त्यांना पदावनत करण्यात येईल.

६) सदरचे आदेश हे शासन आदेश तसेच सर्वोच्च न्यायालय व महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई इत्यादी ठिकाणी या संबंधातील दावे/याचिका झाली असल्यास सदर प्रलंबित याचिकांच्या अंतिम निर्णयाच्या आदेशाचे अधिन राहील.

७) संबंधित कर्मचारी पदोन्नतीने पदावर हजर झाले नाहीत अगर त्यांनी पदोन्नती नाकारली तर त्यांना शासन निर्णयानुसार देण्यात आलेल्या वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ काढुन घेण्यात येईल आणि या लाभापोटी दिलेल्या वेतनाची त्यांचेकडून वसूली करणेत येईल. तसेच, शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.३०३/का-१२ दिनांक १२/९/२०१६ नुसार संबंधित नियंत्रण अधिकारी यांनी पुढील कार्यवाही करावी.

८) सामान्य प्रशासन विभाग, अधिसुचना क्रमांक-एसआरव्ही-२०१७/प्र.क्र.४६६/कार्या-१२/ दि.२८/५/२०१८ व प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कडील पत्र क्रं-कक्ष-१०(२)/एक/MSCIT/प्र.क्र.१२१(१८-१९)/ २१८०दि.१८.१२.१८ अन्वये सदर वनरक्षक यांनी संगणक हाताळणी व वापराबाबतचे प्रमाणपत्र प्राप्त केले आहे काय याची खात्री केले नंतरच त्यांना पदोन्नतीचे पदावर रुजू होणेसाठी कार्यमुक्त करावे.

९) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक-एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/कार्यासन १२ दि.१.८.१९ मधील तरतूदीनुसार संबंधीत वनरक्षक यांना मूळ नियुक्तीचे पदावर स्थायित्व प्रमाणपत्र दिले आहे, वयाची ५०/५५ नंतर पुनर्विलोकन होऊन पात्र झालेले आहेत. तसेच हिंदी / मराठी भाषा उत्तीर्ण / सुट दिलेली असलेची खात्री करून आदेश लागू करावेत.

वरील वनरक्षकांना त्यांचे पदोन्नतीचे ठिकाणी रुजू होणेसाठी स्थानिक व्यवस्था करुन **तात्काळ** कार्यमुक्त करावे. तसेच, उपरोक्त कर्मचा-यांना प्रचलित नियमांचे अधिन राहून त्यांचे विभागात रिक्त पदाचे अनुषंगाने पदोन्नतीचे पदावर रुजु करून घ्यावे. संबंधित कर्मचारी पदोन्नतीने पदावर हजर झाले नाहीत अगर त्यांनी पदोन्नती नाकारली तर त्यांना शासन निर्णयानुसार देण्यात आलेल्या वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ काढुन घेण्यात येईल आणि या लाभापोटी दिलेल्या वेतनाची त्यांचेकडून वसूली करणेत येईल. याची संपूर्ण जबाबदारी संबंधित आस्थापना अधिकारी यांची राहील, याची नोंद घ्यावी.

(आर.एम.रामानुजम)
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक)
कोल्हापूर

**प्रति**
वरीलप्रमाणे वनरक्षक यांना त्यांचे नियंत्रण अधिकारी यांचे मार्फत

**प्रतिलिपी :** माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी रवाना.

१.वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, सहयाद्री व्याघ्र राखीव, कोल्हापूर
२.उपवनसंरक्षक, कोल्हापूर, सातारा, सावंतवाडी, सांगली
३.विभागीय वन अधिकारी, रत्नागिरी (चिपळूण)
४.विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण, कोल्हापूर, सांगली, सातारा, सिंधुदुर्ग

**प्रतिलिपी :-** अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना माहितीसाठी सविनय सादर.